## संपादकीय ......

# होळीची धुळवड

*यथेच्छ शिवीगाळ आणि एकमेकांच्या अंगावर चिखलफेक करणे राजकारणी मंडळींना नित्याचेच असले, तरी सर्वसामान्य जनतेला मात्र होळी आणि धुळवड या दोन्ही सणांचे अप्रूप असते. नीतिमत्तेचा दबाव एरव्हीही सामान्य नागरिकांवर जास्तच असतो. दिसला ज्येष्ठ माणूस की, पड त्याच्या पाया, गुरुजनांपैकी कुणी भेटले की, कर लवून नमस्कार, साहेब मंडळी तर वंदनीयच असतात. आदरणीय, वंदनीय, तीर्थस्वरूप, प्रातः स्मरणीय वगैरे आणि तत्सम प्रकारची मंडळी विपुल प्रमाणात अवतीभवती वावरत असताना माणसाने वाह्यातपणा करायचा तरी कधी, या प्रश्नांचे उत्तर 'होळी आणि धुळवडीच्या दिवशी' असेच येईल.*

*घरात कुणीही ऐकत नाही आणि घराबाहेर पडले की, लोकांचे ऐकावे लागते. 'तिन्ही त्रिकाळ किंवा चोवीस तास बारा महिने कोकलत राहावे' अशी परिस्थिती असताना तोंडातून शब्दही काढता येऊ नये ही घुसमट सर्वच सत्शील, सदाचरणी आणि सद्विचारी माणसांना गुदमरून टाकते. याचा निचरा करण्याची संधी आपल्या महान भारतीय संस्कृतीने होळी आणि धुळवड या दोन सणांच्या निमित्ताने दिली आहे. रोज तुम्ही बोंबा मारता ना, मग आज आमच्या बोंबा ऐका, असे ठणकावून सांगण्याचा अधिकार देणारा हा सण महत्त्वाचाच म्हणावा लागेल.*

*सायंकाळी एकदाची होळी पेटते ती पूर्ण विझून जाण्याच्या आत 'लकडी के दुष्मन' कार्यकर्ते अन्य महत्त्वाच्या (?) कार्यासाठी तिथून फरार झालेले दिसतात. दरम्यान, होळीभोवती रेंगाळणारी बारीकसारीक पोरे म्हणजेच भावी कार्यकर्ते उच्चरवात बोंबलण्यास सुरुवात करतात. वर्गणी घेऊन आधी पब्लिकचा खिसा साफ करणे आणि नंतर स्वतःचा घसा साफ करणे एवढे घटनादत्त कर्तव्य होळीसाठी पुरेसे होते.*

*पाठोपाठ असते धुळवड. काही भागांत ती रंगपंचमीच्या दिवशी साजरी केली जाते. 'आज गोकुळात रंग खेळतो हरी, राधिके जरा जपून जा तुझ्या घरी' असे सुरेश भट लिहून गेले. सांप्रत परिस्थिती बदलली आहे. पतीदेव आजकाल रंग खेळण्याऐवजी पहाटेच उठून फार्म हाऊस, शेतामध्ये किंवा गावाबाहेर रंग उधळण्यासाठी जातात आणि पत्नी घरी टीव्हीवरील कार्यक्रम पाहत बसलेली असते. तरुण पुरुष मंडळी शेतामध्ये, फार्म हाऊसवर किंवा गावाबाहेर कुठेतरी चैतन्यरस प्राशनाचा कार्यक्रम करीत असतात. चैतन्यरस प्राशन करून आणि कोंबड्या किंवा शेळ्या रिचवून पब्लिक जोषमध्ये येत असते. एवढे सगळे केल्यानंतर बोंबलण्याचा आवाज मोठा नाही निघाला तरच नवल! कुणीही महागाई, समस्या, टंचाई, भारनियमन यांच्या नावाने ओरडत नाही. सोकाजीराव, मोकाजीरावच्या नावाने ओरडतात आणि टिकोजीराव भिकोजीरावच्या नावाने बोंबलतात.नाव कुणाचेही असो, ओरडणे किंवा बोंबलणे महत्त्वाचे. त्यामुळे आता सर्वांनी कोणत्याही दूषित वातावरणाशिवाय समाजाची निर्मिती करण्याची गरज आहे. होळीच्या निमित्ताने लोक एकमेकांच्या नावाने ओरडत असलो, तरी आता ते नित्याचेच झाले आहे. क्षेत्र कोणतेही असो, सर्व वाह्यातपणा खूपच वाढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे याला आवर होळीच्या निमित्ताने घालण्याची गरज अधोरेखित झाली आहे. सण कोणताही असो, लोकांनी एकमेकांशी सौजन्याने राहण्याची गरज आहे. याची सुरुवात आपण आपल्यापासून केल्यास सर्व काही आनंदमय होईल, हे नक्की!*

# रासायनिक रंगांमुळे त्वचेला होऊ शकते नुकसान, ते टाळण्यासाठी जाणून घ्या 'हे' उपाय!

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

होळीचा सण रंगांनी, मजा आणि आनंदाने भरलेला असतो, परंतु कधीकधी या रंगांमध्ये असलेले रसायने आपल्या त्वचेला आणि केसांना हानी पोहोचवू शकतात. बाजारात उपलब्ध असलेल्या बहुतेक रंगांमध्ये शिसे ऑक्साईड, कॉपर सल्फेट, पारा सल्फेट आणि रंग यासारखे हानिकारक घटक असतात, ज्यामुळे त्वचेवर लर्जी, खाज सुटणे, जळजळ होणे, पुरळ येणे आणि पुरळ उठणे होऊ शकते. कधीकधी या रंगांमुळे होणारी समस्या इतकी गंभीर होते की डॉक्टरांचा सल्ला घ्यावा लागतो. अशा परिस्थितीत, विशेषतः ज्यांची त्वचा संवेदनशील आहे, त्यांनी या रंगांबद्दल अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. तर रंगपंचमीनंतर काय काळजी घ्यावी जाणून घेऊया या....

**ॲलर्जी आणि पुरळ येण्याची समस्या–** होळीमध्ये रसायने असलेले रंग वापरल्यास त्वचेवर लालसरपणा, खाज सुटणे आणि पुरळ उठू शकतात. कधीकधी ही समस्या खूप गंभीर बनते.

**कोरडेपणा आणि रुक्ष त्वचा**

कठोर रसायने त्वचेतील ओलावा काढून टाकतात, ज्यामुळे कोरडेपणा, जळजळ आणि घट्टपणा येऊ शकतो. म्हणून, जेव्हाही तुम्ही होळीचे रंग खरेदी करता तेव्हा लक्षात ठेवा की त्यात कोणत्याही प्रकारचे रसायन असू नये. तसेच नैसर्गिक रंगांचा वापर होईल तर समस्यांचे प्रमाण कमी होते.

**टॅनिंग आणि काळे डाग पडणे**

रंगामध्ये रसायन असल्याने सूर्याच्या अतिनील किरणांसोबत रासायनिक रंग मिसळल्याने त्वचेवर काळे डाग येऊ शकते. बऱ्याचदा हे डाग इतके असतात की ते साफ करण्यासाठी आठवडे लागतात. त्यामुळे आपली त्वच्या काळी पडू शकते.



**रंग खेळण्याआधी शरीरावर तेल लावा–** रंगपंचमी खेळताना जर तुम्हाला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये असे वाटत असेल, तर होळी खेळण्यापूर्वी तुमच्या त्वचेला नारळ, मोहरी किंवा ऑलिव्ह ऑइलने चांगले मसाज करा. यामुळे रंग त्वचेत बसत नाही आणि नंतर सहज स्वच्छ होतो. तसेच रंगाचे त्वचेसोबत कोणतेही प्रतिक्रिया होत नाही.

**मॉइश्चरायझर लावा**

जर तुमची त्वचा खूप कोरडी असेल तर तेलासोबत चांगले मॉइश्चरायझर लावा. यामुळे त्वचा हायड्रेट राहील आणि रसायनांचा प्रभाव कमी होईल. यामुळे तुमच्या त्वचेची आर्द्रता देखील टिकून राहील.

**पूर्ण बाह्यांचे कपडे घाला**

होळीला रंग खेळताना, शक्य तितके तुमची त्वचा झाकून ठेवा. या काळात, लांब बाह्यांचे हलके सुती कपडे घाला, जेणेकरून रासायनिक रंग थेट त्वचेच्या संपर्कात येणार नाहीत.

**होळी खेळल्यानंतर हे काम करा**

रंग काढण्यासाठी कठोर साबण किंवा रासायनिक उत्पादने वापरू नका. त्याऐवजी, सौम्य क्लींजर, बेसन, दही आणि कोरफडीच्या जेलने त्वचा स्वच्छ करा आणि ती चांगली मॉइश्चरायझ करा.

# रंगपंचमी : जीवनात हवी रंगांची बरसात

गोकुळात श्रीकृष्णाबरोबर गोप-गोपिकांनी जी रंगपंचमी साजरी केली त्या रंगपंचमीला भक्तीचा रंग होता. आपल्या स्वातंत्र्यवीरांनी, क्रांतिकारकांनी, देश भक्तांनी स्वातंत्र्य मिळावं म्हणून देशासाठी बलिदान दिले. या बलिदानाचा रंग होता त्यागाचा व समर्पणाचा.

सूर्यास्ताला आकाशात नानाविध रंगाची उधळण रविराज करतो ती आकाशाची रंगपंचमी नेहमीच आपलं मन मोहून घेते. आकाशाचा निळा रंग, शेत शिवाराचा हिरवा रंग, खळखळणाऱ्या नद्यातील पाण्याचा पांढरा रंग, फांदीवर फुलणाऱ्या रंगीबेरंगी फुलांचे विविध रंग, फुलाभोवती गुंजन करणाऱ्या भुंग्यांचे रंग, बागेत बागडणाऱ्या चिमुकल्या फुलपाखरांचे रंग अशा विविध रंगांची रंगपंचमी आपल्या अवतीभोवती नेहमीच फुलत असते.



जीवनात रंगांची अखंड बरसात हवीच. त्याचबरोबर विविधरंगी रंगांची उधळणही हवी. मानवी जीवनात जर प्रेम नसेल, आस्था व जिव्हाळा नसेल तर जगणंही रंगतदार होत नाही. रंगपंचमीचे रंग आपल्याला जीवनातले बरेच तत्त्वज्ञान शिकवून जातात.

ग्रामीण तसेच शहरी भागामध्येही बाळगोपाळांबरोबरच युवक-युवतीही रंगपंचमी खेळत असतात. यावेळी अनेक रंगांची उधळण केली जाते. बाजारांमध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध आकाराच्या व रंगांच्या पिचकाऱ्या उपलब्ध असतात. या पिचकार्यांतून रंग उधळून पंचमी साजरी केली जाते. मित्र-मैत्रिणी, अबालवृद्धही रंगपंचमीच्या उत्सवात सहभागी होतात. काचेच्या रंगांनी अलिकडे या उत्सवाला बेगडी स्वरूप आले असले तरीही रंगपंचमी मोठ्या थाटात साजरी केली जातेच.

# उन्हाळी बाजरी, गहू, मका पिकांसाठी कृषी सल्ला

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक** – सद्यस्थितीत उन्हाळ बाजरी वाढीच्या अवस्थेत असून या पिकासाठी पाणी व्यवस्थापन, तसेच गहू पीक काही भागात पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी कापणी सुरु झाली आहे. शिवायरब्बी मका पीक पक्वतेची अवस्था, कापणी अवस्थेत आहे. या तिन्ही पिकांसाठी ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्राकडून सल्ला देण्यात आला आहे.

**उन्हाळ बाजरी पाणी व्यवस्थापन**

जमिनीच्या मगदुरानुसार व पिकाच्या वाढीच्या संवेदनक्षम अवस्थेत १० ते १२ दिवसांच्या अंतराने ५ ते ६ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पाण्याची उपलब्धता मर्यादित असल्यास, पहिले पाणी फुटवे येण्याच्या वेळी (पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी), दुसरे पाणी पीक पोटरीत असताना (पेरणीनंतर ३५ ते ४५ दिवसांनी), तिसरे पाणी दाणे भरतेवेळी (पेरणीनंतर ६० ते ६५ दिवसांनी) द्यावे.

**गहू पक्वतेची अवस्था, कापणी अवस्था**

वेळेवर पेरलेल्या गव्हाची काढणी व मळणी करावी.

गहू पीक पक्व होण्याच्या २-३ दिवस अगोदर पिकाची कापणी केल्याने गव्हाचे दाणे शेतात झडण्याचा प्रकार आढळत नाही.

गहू पिकाची काढणी सकाळच्या वेळेस करावी.

गव्हाची मळणी यंत्राच्या सहय्याने करावी किंवा कापणी व मळणी कंबाईन हार्वेस्टर मशीनने करावी.

मळणी करतांना दाणे फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी.

उशिरा पेरणी केलेल्या गहू पिकाला जास्त काळ उष्ण तापमानाचा सामना करावा लागणार आहे.

त्यामुळे या पिकाला दर पंधरा दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

म्हणजे एकूण काळात पाण्याच्या ५ पाळ्या (नियमित ४ अधिक अतिरिक्त १) द्याव्या लागतील.

पाण्याच्या दोन पाळ्यांदरम्यान जास्त अंतर राहणार नाही, याची काळजी घ्यावी.

कारण जमीन कोरडी पडल्यास उंदरांचा त्रास होण्याची शक्यता असते.

**रब्बी मका पक्वतेची अवस्था, कापणी अवस्था**

कणसे पिवळसर, दाणे कडक झाल्यानंतर कणसे खुडून काढावीत.

ही कणसे दोन ते तीन दिवस उन्हात चांगली वाळवावीत.

त्यानंतर कणसाच्या वरील आवरण काढून मका सोलणी यंत्राच्या (म.फु.कृ.वि. राहुरीद्वारे विकसित सुधारित अवजार) साह्याने कणसातील दाणे वेगळे करावेत. दाण्यांतील पांढरी तुसे, बिट्ट्याचे तुकडे वेगळे करण्यासाठी उफनणी करावी.


दाणे चांगले उन्हात वाळवून दाण्यांतील आर्द्रता १२ टक्क्यांपर्यंत ठेऊन साठवण करावी.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी












# लाल मिरची खाणे पडू शकते महागात

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

भारतीयांचे जेवण लाल-तिखटाशिवाय होणे तसे कठीणचं ! कोणतीही भाजी किंवा विशिष्ट पक्वान बनवताना आपण तिखटाचा वापर करतोच. त्याऐवजी झणझणीत भाजी तयार होणे अशक्य असे म्हणणे चुकिचे ठरणार नाही. या लाल तिखटामध्ये लाल मिरचीचा वापर केला जातो. ज्यामुळे पदार्थाला विशिष्ट चवही येते आणि रंगही येतो. हल्ली तर लाल मिरचीचे टॉपिंग पिझ्झा-पास्तावर टाकून खाण्यात येते. पण, ही झणझणीत लाल मिरची जास्त प्रमाणात खाणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. डॉक्टरही, जास्त तिखट खावू नये असा सल्ला देतात कारण लाल मिरचीच्या सेवनाने आरोग्याशी संबधित अनेक समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे निरोगी आरोग्यासाठी लाल मिरची प्रमाणात खाणेच योग्य समजले जाते. असे असले तर लाल मिरची जास्त प्रमाणात खाणे कसे महागात पडू शकते पाहूयात,

पोटावर परिणामकारक –लाल मिरचीमध्ये अनेक पोषक तत्त्वे असतात, ज्यात कॅप्साइन नावाचा पदार्थही आढळतो. या पदार्थाच्या सेवनाने पोटामुळे जळजळ जाणवते आणि आतडयानाही त्रास जाणवतो. परिणामी, तुम्हाला वारंवार अपचन, गॅस, पोटदूखी जाणवते. लाल मिरची तिखट असते, त्यामुळे तिखट पदार्थ खाल्याने पोटात अल्सर होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे जास्त तिखट पदार्थ खाणे टाळा.

लाल मिरचीच्या सेवनाने तोंड, डोळे आणि शरीराच्या आतील भागात जळजळ जाणवू शकते. तसेच जास्त तिखट खाल्याने डोळ्यांना त्रास होऊ शकतो, डोळ्यांतून पाणी येवू शकते. ज्यामुळे डोळ्यांच्या विविध समस्या जाणवू शकतात.



मानसिक आरोग्यावर होतो परिणाम – लाल मिरची खूप जास्त प्रमाणात खाल्लाने मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. तुम्हाला ताण, तणावाच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते.

**उष्णता वाढते** –लाल मिरचीच्या अतिसेवनाने शरीरातील उष्णता वाढू शकते कारण लाल मिरची निसर्गत: उष्ण असते.ऍलर्जी –अनेकांना कोणत्यातरी गोष्टीची ऍलर्जी असते, तुम्हाला जर तिखटाची ऍलर्जी असेल तर तुम्ही लाल मिरचीचे सेवन टाळायला हवे. अशा परिस्थितीत, जर ऍलर्जी असेल आणि लाल मिरची तुम्ही खाल्लीत तर त्वचेवर खाज येणे, रॅशेस अशा समस्या जाणवू शकतात.

## विद्युत विभागाच्या निष्काळजीपणाचा परिणाम

# असदपूरमध्ये वीज तारेच्या घर्षणाने ४ एकरमधील लाखोंचे बांबू वन जळून खाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अचलपूर**

अचलपूर तालुक्यातील असदपूर येथे विद्युत तारेच्या घर्षणामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. प्रगतिशील शेतकरी संजय तापडिया यांच्या शेतातील लाखो रुपयांचे बांबू वन जळून खाक झाले आहे.

तापडिया यांनी मौजा रायपूर येथील गट क्रमांक ३४ मधील ४ एकर शेतात तीन वर्षांपूर्वी बांबूची लागवड केली होती. पिकाचे उत्पादन मिळण्याच्या टप्प्यात असताना वीज तारेच्या घर्षणामुळे ठिणगी पडून संपूर्ण बांबू वन जळाले.महत्त्वाची बाब म्हणजे तापडिया यांनी या धोक्याची पूर्वसूचना दोन वर्षांपूर्वीच विद्युत विभागाला दिली होती. असदपूर उपकेंद्रातील कृषी रोहित्रावरून जाणाऱ्या एलटी लाईनमुळे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करून त्यांनी विद्युत तारांऐवजी केबल [illegible] मागणी केली होती.



तत्कालीन आमदार बळवंत वानखडे यांनीही अचलपूरचे कार्यकारी अभियंता आणि असदपूर उपकेंद्र अभियंता यांना लेखी पत्र देऊन केबल टाकण्याची विनंती केली होती. मात्र विद्युत वितरण कंपनीच्या अभियंत्यांनी या मागणीकडे दुर्लक्ष केले.आता या नुकसानीस महावितरण कंपनीला जबाबदार धरून नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. या घटनेमुळे अचलपूर उपविभागातील विद्युत वितरण कंपनीच्या कामकाजाबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १३ मार्च २०२५ शहर/ग्रामिण

# मुख्यमंत्री-तीर्थ दर्शन योजना अंतर्गत धामणगाव रेल्वे स्थानकावरून ७४२ तिर्थकरुंचे अयोध्येकरीता प्रस्थान



## स्टेशन स्थानक झाले भगवामय ; जय श्रीरामाच्या गगनभेदी घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३धा.रेल्वे,**

राज्यातील सर्व धर्मीयांमधील ६० वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना देशातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' राबवण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतांना महायुती सरकारने घोषित केले होते, त्यानुसार या योजनेचा शासन निर्णय प्रसिद्ध होताच या योजने अंतर्गत पहिल्या टप्प्यातील यवतमाळ जिल्ह्यातील ७४२ तीर्थ करू व ५८ सहाय्यक असे एकूण ८०० तिर्थकरुंनी धामणगाव रेल्वे स्थानक वरून श्रीराम मंदिर अयोध्येला दर्शनासाठी नोंदणी केली होती. यापैकी ७४२ यात्रेकरु रवाना




झाले.सदर योजनेत भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्रातील ६६ तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. या योजनेच्या अंतर्गत तीर्थक्षेत्रींना निशुल्क पाणी चहा जेवण व्यवस्था करण्यात आलेली आहे जवळपास देशातील व राज्यातील सर्व महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा समावेश या योजनेत आहे. भारत गौरव नावाने अयोध्येकरिता प्रस्थान केलेल्या गाडीला यात्रा व्यवस्था प्रमुख व यवतमाळ जिल्ह्याच्या समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मंगला वामनराव मून यांनी हिरवी झेंडी दाखवली.याप्रसंगी सल्लागार समिती सदस्य कमल छांगाणी,अर्चना राऊत,स्टेशन प्रबंधक मुदलियार,आर पी एफ च्या पोलीस निरीक्षक यशोदा यादव,उपनिरीक्षक एच.एल.मिना, गजानन जाधव, राजेश औतकर,दत्तापूर ठाणेदार गिरीश ताथोड,कमर्शियल इन्स्पेक्टर दीपक साहू, लॉयन्सचे चेतन कोठारी,विलास बुटले व सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.ट्रेनचे सारथी आनंद यादव हजारीलाल आणि श्री करीम यांचे यावेळी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. धामणगाव च्या स्टेशनवरून गाडी १ वाजून ४३ मिनिटांनी निघाली.ट्रेनला पाच एसी तसेच सात स्लीपर कोच असून व्यवस्थे करिता २ डब्बे अतिरिक्त लावण्यात आले आहेत अशा एकूण या ट्रेनला १४ डबे आहेत बुधवारी निघालेली सदर गाडी २६ मार्चला परतीच्या मार्गावर राहील. येथील रेल्वे स्टेशनवर जय श्रीरामाच्या गगनभेदी घोषणा व सर्वत्र भगवामय वातावरणाने धामणगाव स्टेशन जणू अयोध्या नगरी भासत होते जाणाऱ्यांमध्ये यवतमाळ व कळंब तालुक्यातील प्रत्येकी १०८ ज्येष्ठ नागरिकांचा समावेश आहे. नेर तालुका ५८, दारव्हा ९, बाभूळगाव ४१, दिग्रस ८६, पुसद ४०, उमरखेड ९३, महागाव ५७, आर्णी २५, घाटंजी ११३, राळेगाव ५१, पांढरकवडा १५, वणी २ यापैकी ७०० ज्येष्ठांचा या यात्रेत समावेश आहे ज्येष्ठ भक्तांसोबत सोबत सहकार्य म्हणून ५८ सहाय्यक सुद्धा रवाना झाले आहेत अयोध्येला जाणारे ज्येष्ठ बुधवारी सकाळ पासूनच धामणगाव रेल्वे स्टेशनवर उपस्थित होते. ट्रेनला पाच एसी तसेच सात स्लीपर कोच असून व्यवस्थे करिता २ डब्बे अतिरिक्त लावण्यात आले आहेत पहिल्या टप्प्यातील धामणगाव शहरातून शुभारंभ होत असून अयोध्या हे पहिले तीर्थक्षेत्र म्हणून निवड करण्यात आली आहे. सदर योजनेत भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्रातील ६६ तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. या योजनेच्या अंतर्गत तीर्थक्षेत्रींना निशुल्क पाणी चहा जेवण व्यवस्था करण्यात आलेली आहे जवळपास देशातील व राज्यातील सर्व महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा समावेश या योजनेत आहे. देशातील मोठ्या तीर्थस्थळांना एकदातरी भेट देण्याचे ज्येष्ठ नागरिकांचे स्वप्न असते. आर्थिक स्थिती नसल्याने किवा सोबत कोणी नसल्याने त्यांची ही इच्छा पूर्ण होत नाही. अशा ज्येष्ठ नागरिकांना यात्रांना जाऊन मनःशांती तसेच अध्यात्मिक पातळी गाठणे सुखकर व्हावे, यासाठी राज्यातील सर्व धर्मीयांमधील ज्येष्ठ नागरिकांना भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची व दर्शनाची संधी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने अंतर्गत करण्यात आली आहे.याप्रसंगी रेल्वे स्टेशन वर लॉयन्स क्लब (इलीट) ने बिस्कीट वितरण केले.

# सोयाबीन खरेदीत अनियमितता, महिना उलटला तरीही चुकारे नाहीत

## जिल्हा उपनिबंधकांचे खरेदी-विक्री व्यवस्थापकाला पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

शेतकऱ्यांकडून किमान आधारभूत किमतीने झालेल्या सोयाबीन खरेदीतील अनियमितेबाबत जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी खरेदी विक्री समितीचे अमरावती तालुका व्यवस्थापकांना पत्र देत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहे. यामध्ये त्यांनी अमरावती तालुका शेतकरी खरेदी विक्री समितीचे अध्यक्ष पंकज देशमुख यांनी दिलेल्या पत्राचा संदर्भ देत उत्तर मागितले असून चुकारे तात्काळ करण्याच्या दृष्टीने संबंधितांना निर्देश दिले आहेत. अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक सोयाबीन खरेदी झाली. त्यामध्ये अमरावती तालुक्यातून दहा हजार किटल सोयाबीनचे पाच कोटी रुपयाचे चुकारे अजूनपर्यंत झाले नसल्याची माहिती आहे.

अमरावती तालुका खरेदी विक्री समितीचे अध्यक्ष पंकज देशमुख यांनी समिती व्यवस्थापकांना पत्र देत शासकीय खरेदीमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप केला होता. पंकज देशमुख यांच्या म्हणण्यानुसार संस्थेकडून शासकीय आधारभूत किमतीनुसार सोयाबीन खरेदी सुरू करण्यात आली ही खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे आवारामध्ये सुरू होती. ६ फेब्रुवारी ही सोयाबीन खरेदीची शेवटची किती होती. त्यानंतर शासनाने सोयाबीन खरेदी बंद केली. परंतु आजपर्यंत पूर्ण खरेदी झालेला सोयाबीनचा स्टॉक शासकीय गोदामामध्ये गेलेला नाही. यासंदर्भात पंकज देशमुख यांच्याकडेसुद्धा शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या होत्या. यासंदर्भात त्यांनी स्वतः बाजार समितीमध्ये पाहणी केली असता सोयाबीनच्या खरेदी केलेल्या पोत्याच्या शिलाई खुल्या असल्याचे दिसून आले. सोयाचीनची पुन्हा चाळणी



कशा करीता सुरू आहे, याबाबत त्यांनी माहिती विचारली. मात्र त्यांना कुठलीही माहिती देण्यात आली नाही. अध्यक्ष देशमुख यांना कोणताही आर्थिक व इतर सह्या करण्याचे अधिकार नाहीत. सोयाबीन खरेदीत कोणताही आर्थिक व्यवहार झाला असल्यास त्याला व्यवस्थापक जबाबदार राहतील, असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे सोयाबीन खरेदी बाबतची सर्व माहिती मासिक सभेत उपाध्यक्ष व मानद सचिवांना देण्यात येते. त्यांनाच आर्थिक व्यवहाराचे अधिकार होते. या खरेदीवर संपूर्ण नियंत्रण हे व्यवस्थापक म्हणून अध्यक्ष उपाध्यक्ष सचिवांसोबत माजी अध्यक्ष प्रशांत काळबांडे, प्रफुल राऊत, संजय निचित या संचालकांचे आहे. खरेदी केलेला सोयाबीनचा साठा शासकीय गोदामामध्ये ठेवण्याकरीता का विलंब होत आहे तसेच शेतकऱ्यांचे चुकारे का केले जात नाहीत, यावर त्यांनीप्रश्नचिन्हे निर्माण केले. त्यांच्यासोबतच मनोज अर्मळ, नितीन हटवार यांनीसुद्धा तक्रारी केल्या आहेत. या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी व्यवस्थापकांना पत्र दिले. शासकीय किमान आधारभूत हमीभावानुसार नाफेडमार्फत जर कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत सोयाबीनची खरेदी मोठ्या प्रमाणात झाली आहे तर अद्यापपर्यंत शेतकऱ्यांनी खरेदीचे चुकारे का मिळाले नाहीत. मार्च सुरू होऊन बँकेचे कर्ज हप्ते भरणे आवश्यक आहे, अन्यथा व्याजाचा भुर्दंड लागू शकतो. अमरावती येथे खरेदी विक्री संस्थेमार्फत सोयाबीनची खरेदी करण्यात आली होती, मात्र ते सोयाबीन अजूनही हस्तांतरित झाल्यानंतर गोडाऊनला पोहोचले नाही. जोपर्यंत सोयाबीन गोडाऊनमध्ये जात नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांना चुकारा दिला जात नाही. त्यामुळे सोयाबीन तात्काळ हस्तांतरित करून शेतकऱ्यांना चुकारे द्या जेणेकरून त्यांना व्याजाचा भुर्दंड लागणार नाही, असे निर्देश जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी दिले आहेत.

**न पाठविलेल्या शेतकऱ्यांची यादी द्या**

संस्थेमार्फत हमीभावाने खरेदी केलेले सोयाबीन गोदामामध्ये पाठवण्याची शेवटची तारीख ८ मार्च २०२५ ही होती. त्या तारखेपासून १०.४२२.६६ किंटल सोयाबीन ६० बाजार समितीमध्ये बेवारस पडून आहे, हे सोयाबीन शेतकऱ्यांनी विकलेले आहे. त्या सर्व शेतकऱ्यांच्या नावाची यादी व मोबाईल नंबर मोजमापासहित देण्यात यावी, अशी मागणी अमरावती तालुका शिवसेना उबाठा गटाचे अध्यक्ष नितीन हटवार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी अमरावती तालुका शेती खरेदी विक्री समितीच्या व्यवस्थापकांना पत्र दिले.

# योगेश वानखडे यांचा नगराध्यक्षपदाचा राजीनामा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३तिवसा-** तिवसा नगरपंचायतचे नगराध्यक्ष योगेश कल्याण वानखडे यांनी आपल्या नगराध्यक्षपदाचा राजीनामा जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे. त्यामुळे आता नगराध्यक्षाची माळा कुणाच्या गळ्यात पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.२०२१ मध्ये झालेल्या निवडणूकीत योगेश वानखडे हे नगरसेवक म्हणून निवडून आलेहोते. त्यांची सर्वानुमते नगराध्यक्षपदी



निवड करण्यात आली होती. नगराध्यक्षपदाला न्याय व नागरिकांच्या तक्रारी, तसेच शहरातील विकासाला प्राधान्य देत निष्पक्षपणे अडीच वर्ष पदभार सांभाळला. सभागृहात इतर सदस्याना संधी मिळावी नगराध्यक्षपदाचा म्हणून राजीनामा दिला, असे यावेळी माध्यमांशी बोलताना योगेश वानखडे यांनी सांगितले. आता नव्याने नगराध्यक्षपदाची संधी कुणाला मिळणार, हे पाहणे औचित्याच ठरणार आहे.

# दर्यापूर मधील खल्लार सर्कल मध्ये प्रहारला मोठं भगदाड

## प्रहार कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३दर्यापूर** – तालुक्या मधील खल्लार जिल्हा परिषद सर्कल मध्ये प्रहार पक्षाला खिंडार पडले असून तेथील सर्वात मोठे घटक असलेले श्री महेश कुरळकर यांचा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाखळे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी व त्यांच्या शेकडोच्या त्यांचा काँग्रेस पक्षात आज प्रवेश झाला असून दर्यापूर तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती चे उपसभापती राजेंद्र पाटील कराळे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश झाला असून यांच्या प्रवेशाने दर्यापूर तालुक्यातील खल्लार जिल्हा परिषद सर्कलमध्ये बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या प्रहार या पक्षाला चांगलेच भगदाड पडलेले असल्याचे दिसून आले त्या परिसरातील त्यांचे अतिशय जवळचे कार्यकर्ते सक्रिय कार्यकर्ते



यांनी सुद्धा सुधाकर पाटील भारसाकडे यांच्या कार्यालयात जाऊन प्रवेश घेतला असून ते निष्ठेने पक्षाचे काम योग्यरीत्या सांभाळतील असा विश्वास सुद्धा सुधाकर पाटील भारसाकडे यांनी बोलताना व्यक्त केला असून लवकरच पक्ष त्यांच्यावर योग्य ती जबाबदारी सोपवणार असल्याचेही भारसाकडे यांनी सांगितले त्याप्रसंगी पक्ष प्रवेशाच्या वेळेस सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आशा आरोग्यसेविकेच्या ड्रेस वाटपात भेदभाव

## शहरात दोन तर ग्रामीणला एक साडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अंजनगाव सुर्जी–**

महाराष्ट्रात नाहीतर संपूर्ण राज्यात मानवाच्या आरोग्याची काळजी घ्यावी त्या दृष्टीने ग्रामीण व शहरी भागात आरोग्य आशा सेविकेची निवड करण्यात आली. कोविडच्या काळात एखाद्या डॉक्टरसारखे काम त्यांनी केल्याचे सर्वश्रुत आहे. परंतु त्यांच्या पोषाख वाटपात आरोग्य विभागाने दुजाभाव केल्याचे दिसून येते. शहरी भागातील आशा वर्करला दोन साड्या तर ग्रामीण भागातील आशा वर्कला एक साडी वाटप केल्याने आशा वर्करमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.१५ ते १६ वर्षापासून आशा सेविका म्हणून काम करीत असताना त्यांना त्यांचा परिचय ड्रेसने (पोषाख) व्हावा त्या दृष्टीने शासन महिला आरोग्य आशा



सेविकेसाठी ग्रामीण व शहरी या दोन्हीसाठी दोन साड्यांची व्यवस्था करीत होते. परंतु यावर्षी ग्रामीण भागातील आशा सेविकेसाठी एका साडीची किंमत त्यांना अदा केली. तर शहरी भागातील आशा आरोग्यसेविकेसाठी दोन साडीची किंमत अदा करण्यात आली. त्यांच्याकडून लसीकरण करून घेणे, गरोदर माता असेल तर त्यांना भेट देणे, क्षयरोगाबाबत घरोघरी जाऊन त्यांना मार्गदर्शन, क्षयरोग, कुष्ठरोग, पात्र जोडपे शोधणे, आयुष्मान कार्ड काढणे, आभा कार्ड काढणे आदी कामे केली जातात. ग्रामीण भागातील आशा सेविकांना तालुक्याच्या किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात महिन्यातून दोन तीनदा बैठकीसाठीसुद्धा जावे लागते. त्या एक साडी किती वेळ वापरतील, असा असंतोष उमटू लागला आहे. ग्रामीण भागातील आशा सेविकांना नागरी शहरीभागासारख्या दोन साड्या (पोषाख) रक्कम देण्यात यावी, अशी मागणी ग्रामीण आशा सेविकेची आहे.

# सुरक्षा कठडे न लावल्यामुळे वृद्धाचा मृत्यू रेल्वे विभागाच्या ठेकेदाराविरुध्द गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती** – भातकुली मार्गावरील रेल्वे क्रॉसींगजवळ सुरु असलेल्या कामावर संबंधित ठेकेदाराने खोदलेल्या खड्ड्यालगत सुरक्षाकठडे किंवा सुरक्षा कर्मचारी न लावल्यामुळे वृद्धाचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी खोलापुरीगेट पोलिसांनी अखेर मंगळवारी अनिकेत अशोकराव पोहोकार (वय ३० रा. राधासिटी) यांच्या तक्रारीवरून ठेकेदारावर गुन्हा दाखल केला. अशोकराव महादेवराव पोहोकार (वय ६० रा. राधीसिटी) असे मृताचे नाव आहे. अशोकराव पोहोकार हेइलेक्ट्रीक फिटींगचे खाजगी काम करत होते. ४ मार्च रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास ते काम आटोपून भातकुली मागनि पायी घरी जात होते. रेल्वे क्रॉसींगजवळ आरओबीचे अंडर




बायपासचे कामसुरु होते आणि रस्त्यालगत ठेकेदाराने मोठे खड्डे खोदून ठेवले होते. रात्रीची वेळ असल्यामुळे अशोकराव यांना खड्डा दिसला नाही आणि ते पाय घसरून खड्ड्यात पडल्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागला आणि त्यांचा मृत्यू झाला.याबाबत खोलापुरीगेट पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून प्रथम आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली. परंतु मृताचा मुलगा अनिकेत पोहोकार याने पूर्ण प्रकरणाची माहिती घेतली आणि संबंधित ठेकेदाराने खोदलेल्या खड्ड्यालगत सुरक्षाकठडे किंवा सुरक्षा गार्ड न लावल्यामुळेच वडिलांचा मृत्यू झाल्याची तक्रार ठाण्यात दिली. त्या आधारावर खोलापुरीगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# नायब तहसीलदारांनी दिलेले ५६११ जन्मदाखले वैध कसे ?

## मालेगावात कारवाई, अमरावतीत का नाही ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–** उशिराचे जन्मदाखले देण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी यांनी कार्यकारी दंडाधिकारी, म्हणजेच तहसीलदार यांना प्राधिकृत केलेले आहे. प्रत्यक्षात तहसीलदारांनी यासाठी नायब तहसीलदारांना प्राधिकृत केले. प्राधिकृत अधिकार्यांना त्यांचे अधिकार प्राधिकृत करता येत नाही. त्यामुळे अमरावती, नांदगाव, अचलपूर व चिखलदरा तालुक्यांत नायब तहसीलदार यांनी दिलेले ५६११ जन्मदाखले अवैध असल्याची चर्चा होत आहे.




निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी याबाबत शासनाकडे मार्गदर्शन मागितले. जन्म आणि मृत्यू (सुधारणा) अधिनियम २०२३ कलम १३ (३) अन्वये जन्म अथवा मृत्यू नोंदीसाठी जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी १३ ऑक्टोबर २०२३ रोजी त्या–त्या तहसीलदारांना प्राधिकृत केले होते. जिल्हाधिकार्यांच्या आदेशात तहसीलदारांना दिलेले अधिकार नायब तहसीलदारांना पुनर्प्रदान करण्याचा कुठलाच उल्लेख नाही व तशी कायद्यात तरतूदही नसल्याची माहिती समोर आलेली आहे. तरीही, चार तालुक्यांत तहसीलदार यांच्याऐवजी नायब तहसीलदार यांनी प्रक्रिया हाताळली व स्वतःच्या स्वाक्षरीने दाखले दिल्याची बाब स्पष्ट झालेली आहे. पुरेसे कागदपत्रे नसताना व दस्तऐवजांवर खोडतोड असल्याने त्याबाबत शहानिशा न करता केवळ आधारकार्डचा आधार घेत जन्मदाखले देण्यात आल्याची तक्रार शासनाकडे व जिल्हाधिकारी यांना प्राप्त झालेली आहे. त्यामुळे जिल्हाधिकार्यांनी तहसीलदारांना प्राधिकृत केले असताना नायब तहसीलदार यांनी जन्मदाखले दिले कसे, याची विचारणा आता होत आहे. त्यामुळे हे सर्व दाखले अनधिकृत ठरत असल्याने रद्द करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. १४ हजार अर्ज जिल्ह्यात जन्मदाखल्यांसाठी प्राप्त झाले आहेत. यापैकी ८ हजारांवर अर्जामध्ये दाखले देण्यात आलेले आहेत.

**मालेगावात कारवाई, अमरावतीत का नाही?**
मालेगाव तालुक्यातही असा प्रकार उघडकीस आलेला आहे. त्यामुळे तेथील जिल्हा प्रशासनाने नायब तहसीलदार यांच्याद्वारे देण्यात आलेले २९७९ जन्मदाखले रद्द केले आहेत. शिवाय जन्मदाखले देण्याचे नायब तहसीलदार यांचे अधिकारही संपुष्टात आणले आहे. अमरावती जिल्ह्यात अमरावती, अंजनगाव सुर्जी येथे प्रकार उघडकीस आल्यानंतरही मालेगावची कारवाई येथे झालेली नाही. नायब तहसीलदारांनी दिलेल्या जन्मदाखल्यासंदर्भात शासनाला मार्गदर्शन मागितले आहे. माहिती प्राप्त होताच कार्यवाही केली जाईल.
– **अनिल भटकर,** निवासी उपजिल्हाधिकारी

# एडीजी रामानंद यांनी घेतला तीन वर्षातील गुन्ह्यांचा आढावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–** अपर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी बुधवारी दुपारी आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ अधिकारी व पोलीस निरीक्षक यांची बैठक घेऊन नवीन कायद्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच मागील तीन वर्षातील आयुक्तालय हद्दीतील गुन्ह्यांचा व कामकाजाचा आढावा घेतला.



पोलीस आयुक्तालय अमरावती येथील वार्षिक शहर निरीक्षणादरम्यान बुधवारी दुपारी सुनील रामानंद, अपर पोलीस महासंचालक नियोजन व समन्वय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी पोलीस आयुक्त कार्यालय येथे बुधवारी दुपारी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. प्रथम त्यांनी डीसीपी आणि पाचही एसपी यांची बैठक घेतली. त्यानंतर आयुक्तालयातील सर्व पोलीस निरीक्षकांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी नवीन कायद्याविषयी मार्गदर्शन केले तसेच मागील तीन वर्षात दाखल झालेल्यागंभीर व महिलांविषयी गुन्ह्यांचा व कामकाजाचा आढावा घेतला.

तसेच शोध न लागलेल्या गुन्ह्यातील आरोपींचा त्वरित शोध घेऊन गुन्हे निकाली करण्याबाबत सूचित केले. गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अत्याचार व बाल लैंगिक अत्याचाराचे गुन्हे का दाखल होतात, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना विचारपुसकेली. त्यानंतर त्यांनी सर्व अधिकाऱ्यांच्या वैयक्तिकरित्या मुलाखती घेऊन त्यांच्या कामकाजाचा व उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला तसेच त्यांच्या अडचणींबाबत विचारणा करून त्या सोडवण्यासंदर्भात प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. यावेळी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पनां बारवकर, सागर पाटील, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस स्टेशनचे व शाखेचे प्रभारी अधिकारी व इतर अधिकारी, अंमलदार उपस्थित होते.

# आ. रवी राणा यांच्या सासु व माजी खा. नवनीत राणांच्या मातोश्री रजिंद्र हरभजनसिंग कौर अनंतात विलीन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई** – माजी खासदार नवनीत राणा यांची आई व आमदार रवी राणा यांच्या सासू रजिंद्र हरभजनसिंग कौर यांचे बुधवार १२ मार्च रोजी निधन झाले.

मृत्यूसमयी त्या ६१ वर्षाच्या होत्या. मुंबईतील सुप्रसिद्ध लिलावती हॉस्पीटल मध्ये कर्करोगावर उपचार सुरू होता. अचानक त्यांची प्रकृती गंभीर झाली उपचार सुरु असताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मागील काही दिवसापासून माजी खासदार नवनीत राणा या आईच्या सेवेत होत्या.

बुधवार १२ मार्च रोजी ४.३० ते५ वा. पर्यंत पार्थिव अंत्य दर्शनासाठी मुंबईतील गोरेगांव निवासस्थान येथे ठेवण्यात आले. त्यानंतर हिंदूस्मशानभूमी ओशिवरा गोरेगांव येथे त्यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.–



# महापालिकेत विषप्राशनाचा प्रयत्न फसला

## प्रशासनाची तारांबळ , पोलीस धडकले, बॉटल जप्त, महिला स्थानबद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–** महापालिकेच्या प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची बुधवारी (ता. १२) सकाळी ११.३० च्या सुमारास चांगलीच तारांबळ उडाली. स्थानिक बेनोडा भागातील एका महिलेने अनुकंपा तत्वावर नोकरी मिळावी वडिलोपार्जित मिळण्याच्या घरात तसेच हिस्सा मागणीकरिता विषप्राशनाचा प्रयत्न केला. सुरक्षा रक्षकांनी या संदर्भात माहिती दिल्याने महिला पोलिस तत्काळ महापालिकेत पोहोचल्या व त्या महिलेच्या हातातून विषाची बॉटल जप्त व त्या महिलेला स्थानबद्ध केले.



प्राप्त माहितीनुसार, उकरडा आठवले हे अतिक्रमण विभागात बडनेरा प्रभागीय कार्यालयात कार्यरत होते. सन १९९७ ला त्यांचे निधन झाले. त्यांना पहिली पत्नी शांताबाई आणि तिच्यापासून विजया ही मुलगी आणि दुसरी पत्नी कुंताबाई हिच्यापासून दोन मुले, अशी तीन अपत्ये आहेत. उकरडा आठवले यांच्या सेवापुस्तिकेवर अठोर (आठवले) असे त्यांचे आडनाव लिहिलेले आहे. त्यांच्या निधनानंतर पहिली पत्नी शांताबाई यांनी पेन्शनवर दावा केला.न्यायालयाने तो मान्य केला. अनुकंपा तत्त्वावर शांताबाई किंवा मुलगी विजया यांना अनुकंपा तत्त्वानुसार नोकरी मिळणे क्रमप्राप्त होते. यावरून उकरडा आठवले यांच्या वारसांमध्ये कुटुंबात वाद उत्पन्न झाला. त्यात प्रभागातील तत्कालिन दोन नगरसेवकांनी शिष्टाई केली. उकीरडा आठवले यांच्या दुसऱ्या पत्नीच्या एका मुलास अनुकंपा तत्त्वावर महापालिकेत नोकरी आणि दुसऱ्या मुलास त्यांच्या एका घराचा मालकी हक्क दिला. विशेष म्हणजे ज्या घराचा ताबा ददुसऱ्या पत्नीच्या दुसऱ्या मुलास दिला, ते घर शांताबाईला तिच्या भावाने बांधूनदिलेले होते. त्या मालमत्तेवर मुळात पहिला हक्क शांताबाई आठवले यांचाच होता. यासंदर्भात शांताबाई, त्यांची मुलगी विजया यांनी सर्व पुरावे मनपा प्रशासनाला दिल्यानंतर शांताबाईचे असेसमेंटमध्ये नाव मालमत्ताधारकांच्या यादीत आले. मात्र त्या घराचा ताबा अद्यापही त्यांच्याकडे नाही. या प्रकरणात मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप शांताबाई आणि विजया आठवले यांनी केला आहे. उकीरडा आठवले यांची कायदेशीर मुलगी असूनही आपणास अनुकंपा तत्वावर महापालिकेत नोकरी मिळू शकत नाही. आता आत्महत्याकेल्याशिवाय पर्याय नसल्याचे विजया आठोर (आठवले) यांनी सांगितले. महापालिका या दरम्यान आयुक्तांसमोर सुनावनी झाल्यामुळे कुंताबाईने शांताबाईचे नाव सांगून कर्ज घेतल्याचे तसेच घरकुलचा लाभ घेतल्याचे कबूल केले होते. त्या सुनावणीची व्हिडीओ क्लीप प्रशासनाला मागत असून प्रशासन ती देण्यास टाळाटाळ करीत आहे, असा आरोप विजया आठोर यांनी करीत महापालिका प्रशासनाच्या कामकाजावर ताशेरे ओढले. सहमती पत्र नसतांना दूसऱ्याला नोकरी कशी दिली. सन २०१६ च्या शासन निर्णयानुसार ज्याला अनुकंपा तत्वावर नोकरी दिली, त्याच्या विरोधात जर तक्रारी असतील तर त्याला नोकरीवरुन खारीज करावे, असे आदेश असतांना प्रशासन गप्प का आहे. न्याय मागून, भांडून मिळत नाही म्हणून आत्मदहन करु असा इशारा प्रशासनाला दिला होता, असेही विजया आठवले यांनी सांगितले.

# तगडे संख्याबळ असूनही भाजपची अत्यंत सावध पावलं; तीन आमदारांसाठी ‘सिक्रेट स्ट्रॅटेजी’

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ मुंबई–** महाविकास आघाडी सरकार काळात पुरेसे संख्याबळ नसताना भाजपने विधान परिषदेच्या पाचही जागा जिंकल्या होत्या. विद्यमान मुख्यमंत्री आणि तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपने हा चमत्कार घडवून आणला होता. अत्यंत सावध पावलं टाकत, भाजपने ती निवडणूक जिंकवून दाखवली होती. आताही विधान परिषदेच्या पाच जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. आता तर भाजपकडे तगडे संख्याबळही आहे. पण त्यानंतरही भाजपने अत्यंत सावध पावलं टाकत या निवडणुकीसाठी सिक्रेट स्ट्रॅटेजी तयार केली आहे.

महाविकास आघाडीकडे पुरेसे संख्याबळ नसल्याने पाचही जागा महायुतीला मिळणार आहेत. पाचपैकी तीन भाजपला, एक राष्ट्रवादीला आणि शिवसेनेला जागा मिळणार असल्याची माहिती आहे. यात तिन्ही पक्षांकडून वरिष्ठ पातळीवर नावेही फायनल झाली असल्याची माहिती आहे. १७ मार्चला उमेदवारी अर्ज भरण्यात येणार आहेत. यासाठी प्रत्येक अर्जावर दहा सह्या सूचक म्हणून लागतात. मात्र उमेदवार कोण असणार हे न सांगताच भाजपच्या



आमदारांच्या सह्या घेण्यात आल्या आहेत. तुम्ही कोणाच्या उमेदवारी अर्जावर सह्या करत आहेत, याची माहिती त्यांना देण्यात आली नाही. त्यामुळे तीन आमदारांसाठी भाजप किती गोपनीय पद्धतीने रणनीती आखत आहे याचा अंदाज येऊ शकतो.

**भाजपकडून तीन नावे फायनल :** महायुतीत विधानपरिषदेवर असलेले भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर, प्रवीण दटके, रमेश कराड हे विधानसभेवर निवडून गेले. त्यांच्याजागी भाजपने ३ नावं निश्चित केल्याची माहिती समोर येत आहे. ही तीन नावे दिल्लीत फायनल करण्यात आल्याचेही बोलले जात आहेत. महाराष्ट्र भाजपकडून दादाराव केचे, अमरनाथ राजूरकर आणि माधव भंडारी या ज्येष्ठ व एकनिष्ठ नेत्यांना आमदारकीची संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

**शिवसेना – राष्ट्रवादी कोणाला देणार संधी?**
एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून माजी आमदार रवींद्र फाटक, शितल म्हात्रे आणि चंद्रकांत रघुवंशी यांची नाव आघाडीवर असून त्यांच्यापैकी एकाची वर्णी लागणार असल्याची चर्चा आहे. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून माजी आमदार झिशान सिद्दकी, संग्राम कोते–पाटील आणि माजी खासदार आनंद परांजपे यांची नावे चर्चेत आहेत.या तीन जणापैकी एकाची वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे.

# रुग्णालय प्रशासनाने तयार केला १८.४२ कोटीचा आराखडा सुपर स्पेशालिटी होणार ३२० खाटांचे; १०० खाटांचा विस्तार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–** येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात (सुपर स्पेशालिटी) तिसऱ्या टप्याच्या हालचाली सुरु झाल्याने हे हॉस्पीटल ३२० खाटांचे होणार आहे. तिसऱ्या टप्यात १०० खाटांचा विस्तार होणार असून त्यासाठी रुग्णालय प्रशासनाने १८ कोटी ४२ लाखांचा आराखडा तयार केला. तत्कालीन पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्या काळात मंजूर सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलचे दोन टप्पे पूर्ण झाले असून या रुग्णालयात २२० रुग्णांवर उपचार करण्याची सोय झाली. तिसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर आणखी १०० रुग्णांवर उपचाराची सोय होणार आहे. तिसऱ्या टप्यात पोटविकाराशी संबंधित गॅस्ट्रो एन्टेरोलॉजी गुडघा, मांडी, कानाशी संबंधित इम्प्लॉन्ट सर्जरी सुरु केली जाणार आहे. हा विभाग १०० खाटांचा असेल. या विभागासाठी १८ कोटी ४२ लाखांचे अंदाजपत्रकही तयार केले असून, ते संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांनी तो तयार केला असून आरोग्य महासंचालकांकडे पाठवला, आमदार सुलभा खोडके यांनीही त्यासाठी आरोग्य मंत्र्यांकडे पाठपुरावा सुरु केला आहे.सुपर स्पेशालिटीच्या टप्पा एक मध्ये तयार इमारतीत यूरोलॉजी, प्लॉस्टिक सर्जरी, नेफ्रोलॉजी, डायलेसीस युनीट, पेडियाटिकएआयसीयु, पॅथोलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी, किडनी प्रत्यारोपण सुरु केले. तर दुसऱ्या टप्प्यातील इमारतीमध्ये



न्यूरोलॉजीच्या शस्त्रक्रिया, ऑन्कोलॉजीच्या शस्त्रक्रिया, इको विभाग थाटला आहे. त्यामुळेच आता तिसऱ्या टप्प्यात पोटविकार आणि कान–नाक–घसा तसेच गुडघा, मांडी आदीचे आजार बरे केले जातील, अशी सोय उपलब्ध केली जात आहे. दरम्यान टप्पा तीन मध्ये तयार कराव्या लागणाऱ्या इमारतीसाठी सुपर स्पेशालिटीमध्ये जागाही उपलब्ध आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयाची निकामी झालेली जुनी इमारत आणि प्री फॅब्र हॉस्पीटलच्या बाजूची खुली जागा टप्पा तीनमधील नव्या इमारतीसाठी वापरली जाणार आहे. याच इमारतीच्या छतावर हेलॉपेंडही उभारले जाणार आहे.

# मोगरा शेतशिवारात हरभऱ्याच्या गंजीला आग, एक लाखांचे नुकसान

## तळेगाव दशासर पोलीसांत दोघांविरूध्द गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३चांदूर रेल्वे**
चांदूर रेल्वे तालुक्यातील व तळेगाव दशासर पोलीस स्टेशन अंतर्गत येर्णाय़ा मोगरा शेतशिवारात हरर्भय़ाच्या गंजीला आग लागून शेतर्क.याचे एक लाखांचे नुकसान झाल्याची घटना १० मार्च रोजी रात्री ११.३० वाजताच्या दरम्यान घडली असुन याप्रकरणी दोन आरोपींविरूध्द ११ मार्चला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार, फिर्यादी मनोहर शंकरराव बन्सोड यांच्याकडे मोगरा शेतशिवारात १० एकर शेती असुन त्यापैकी अडीच एकर हरभरा पिक पेरले होते. पाच – सहा दिवसापुर्वी चना पिक सोंगुन शेतातच गंजी मारून ठेवले होते. अशातच १० मार्च रोजी रात्री ११.३० वाजताच्या दरम्यान घरातील लाईट गेल्यामुळे फिर्यादीचा लहान मुलगा निलेश मनोहर बन्सोड हा लाईट का गेली पाहण्याकरिता उठला असता त्याला शेतामध्ये मोठी आग दिसली. तर त्याने मोठा भाऊ पंकज मनोहर बन्सोड याला आवाज देवुन उठवले. यानंतर दोघांनीही शेतात जावुन पाहिले तर हरर्भय़ाच्या गंजीला आग लागल्याचे दिसले. दोघांनीही आग विझविण्याचा प्रयत्न केला,



पंरतु लाईट नसल्यामुळे ते आग विझवु शकले नाही. तसेच अग्निशमन दलाचे वाहन येईपर्यंत हरर्भय़ाची गंजी जळून खाक झाली होती. त्यांच्या शेताजवळून जाण्या – येण्याचा रस्ता असुन गंजीला आग लागली होती तेव्हा तेथून भीमराव सुभाष ढेकले (वय ३० वर्ष) व रामसिंग श्यामसिंग कचवे (वय ४० वर्ष) हे दोघे जातांना निलेश मनोहर बन्सोड़ याला दिसले. त्यामुळे या दोघांनीच माझे शेतातील हरर्भय़ाची गंजी जुन्या वादातुन पेटवून माझे १ लाख रूपयाचे रूपयाचे नुकसान केल्याची तक्रार फिर्यादी मनोहर बन्सोड यांनी तळेगाव पोलीसांत दिली. यावरून पोलीसांनी भीमराव सुभाष ढेकले व रामसिंग श्यामसिंग कचवे, दोन्ही रा. मोगरा यांच्याविरुध्द बीएनएस कलम ३२६ (एफ) व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास तळेगाव दशासर पोलीस करीत आहे.–

# मेळघाटसह भटकंती असलेल्या पशुधनाची गणना करा – गवळी समाज संघटनेची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–** महाराष्ट्र शासन पशुधन विभागामार्फत पशुधन गणना राबविण्यात येत आहे त्याची अंतिम तारीख ही १५ मार्च असून आत्तापर्यंत मेळघाट येथील प्रामुख्याने पशुपालन करणाऱ्या गवळी समाजातील बांधवांच्या



गोधनाचे गायी व म्हशीची गणना अद्याप झालेले नाहीये हे लक्षात येताच महाराष्ट्र गवळी समाज संघटना अमरावती जिल्हा अध्यक्ष सदाशिव भाऊ खडके शहराध्यक्ष संजय भाऊ गुंजाळे गवळी समाज संघटना युवा अध्यक्ष अमरावती जिल्हा अक्षय अभिमान डोईजड व समाजाचे पदाधिकारी प्रमोद यमगवळी, संतोष भाऊ गवळी उपसरपंच इंदला, रितेश यमगवळी व अनिकेत यमगवळी यांनी महाराष्ट्र शासनाचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे कार्यालय येथे उपायुक्त साहेब यांच्या दालनात सह आयुक्त डॉक्टर महल्ले साहेब यांना या संदर्भात निवेदन दिले व अमरावती जिल्ह्यातील गवळी समाजाचे पशुधन व सर्वच पशुधनाची व्यवस्थित गणना व्हावी याकरिता निवेदन दिले महाले साहेबांनी सुद्धा त्याची दखल घेत पावले उचलले जातील असे आश्वासन समाज बांधवांना दिले.

# शंभर दिवसाच्या कृती आराखड्याची सर्व कार्यालयांनी अंमलबजावणी करावी : विभागीय आयुक्त श्वेता सिंघल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

राज्य शासनाने शंभर दिवसासांठी सात कलमी कृती आराखडा निश्चित केला असून अमरावती विभागातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी असे निर्देश अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी दिले.विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिक्षक, महानगर पालिका आयुक्त, आणि सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांची दूरदृश्य प्रणालीमार्फत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सर्व संबंधित विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.क्षेत्रीय कार्यालयाच्या कृती आराखड्यातील कामांचा आढावा घेऊन विभागीय आयुक्त सिंघल पुढे म्हणाल्या की, राज्य शासनाने प्रशासनिक विभागासाठी शंभर दिवसांचा कृती आराखडा निश्चित केला असून त्याच धर्तीवर क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांकरिता ७ मुद्यावर प्रभावी कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्यामध्ये १) संकेतस्थळ २) सुकर जीवनमान ३) स्वच्छता ४) जनतेच्या तक्रारीचे निवारण ५) कार्यालयातील सोयी सुविधा ६) गुंतवणूक प्रसार आणि ७) क्षेत्रीय कार्यालयांना भेटी याचा समावेश आहे. सर्व विभागाच्या कार्यालयांना या मुद्यावर कार्यवाही करून १५ एप्रिल पर्यंत अहवाल सादर करायचा आहे. अशा कार्यवाहीची पाहणी करण्यात येऊन पुरस्कार देण्याची योजना आहे.प्रत्येक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी १० ते १५ दिवस लक्ष देऊन काम केल्यास कृती आराखड्यातील सर्व बाबींची उत्कृष्ट अंमलबजावणी होऊ शकते. यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे असे सांगून आयुक्त सिंघल म्हणाल्या की, सर्व कार्यालयांच्या इमारतीत साफसफाई, स्वच्छता आणि सुविधांवर भर देण्याची गरज आहे. पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहाची व्यवस्था चोख असली पाहिजे. सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या अधिनस्त कार्यालयात ह्या सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्याची खातरजमा करावी व कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचा सातत्याने आढावा घ्यावा असेही त्या म्हणाल्या.नागरिकांच्या तक्रारीचे निवारण करतांनाच कार्यालयातील आस्थापना विषयक बाबींची पूर्तता होईल याची दक्षता घ्यावी असे सांगून आयुक्त सिंघल यांनी 'आयजीओटी' या पवर नोंदणी करून प्रशिक्षण पूर्ण करण्याचे आवाहन केले. ई ऑफिस प्रणालीच्या वापराचे महत्त्वही त्यांनी विशद केले.



# ५९ प्राथमिक आरोग्य केंद्रांत उष्माघात कक्ष

## जिल्हा परिषदेचा अलर्ट : जिल्ह्याचा पारा ३९ अंशांवर पोहोचल्यामुळे उपाययोजना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

उन्हाच्या झळा वाढल्या असून, कमाल तापमान ३९ अंशांवर गेले आहे. तसेच पुढील तीन महिने पारा अधिक वाढणार आहे. यामुळे जिल्हा परिषद आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. सीईओ संजिता महापात्र यांनी सर्व ५९ प्राथमिक आरोग्य केंद्रांत उष्माघात कक्ष स्थापन करून तेथे पुरेसा औषधसाठाही ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. आरोग्य विभागाने प्रत्येक पीएचसीत उष्माघात कक्ष सज्ज केला आहे. दरवर्षी एप्रिल ते जून महिन्यात उष्माघाताचा प्रादुर्भाव होतो. जिल्ह्यात कमाल तापमान ३९ अंशांवर पोहोचला आहे. उष्माघात टाळण्यासाठी नागरिकांनाही काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.दर तासाला १ ते १.५ ग्लास पाणी घ्यावे, लिंबू सरबत, फळांचा ताजा रस, पन्हे, कोकम सरबत, ताक, लस्सी असे द्रवपदार्थ घ्यावेत. आराम करावा सैलसर, पातळ, फिकट रंगाचे किंवा पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान करावेत.



**उन्हापासून असा करा बचाव**

दर तासाला १ ते १.५ ग्लास पाणी घ्यावे, लिंबू सरबत, फळांचा ताजा रस, पन्हे, कोकम सरबत, ताक, लस्सी असे द्रवपदार्थ घ्यावेत. आराम करावा सैलसर, पातळ, फिकट रंगाचे किंवा पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान करावेत.

# घर सांभाळणारी स्त्री निर्माण करतेय स्वतःची ओळख : कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते

## यशस्वी महिला उद्योजकांचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**


आजची स्त्री केवळ घरगुती जबाबदाऱ्या सांभाळत नाही. तर, ती उद्योग, स्टार्टअप आणि नवकल्पनांमध्येही स्वतःची ओळख निर्माण करत आहे. सर्वांनी अशा महिलांकडून प्रेरणा घेऊन त्यांच्या कार्याला पाठिंबा द्यावा, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ रिसर्च अँड इनक्यूबेशन फाउंडेशनमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिवसानिमित्त यशस्वी महिला उद्योजकांचा सन्मान करण्यात आला. त्या प्रसंगी अध्यक्षीय भाषणातून मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, अमरावतीचे उपायुक्त डी. एल. ठाकरे, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरकर उपस्थित होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश महिलांचे सशक्तीकरण वाढविणे आणि स्टार्टअप संस्कृतीमध्ये महिलांचा अधिकाधिक सहभाग सुनिश्चित करणे हा होता. तसेच सर्वप्रथम कुलगुरू डॉ. बारहाते यांच्या हस्ते शिवानी बापट, डॉ. केतकी कालेले, नेहा मोटवानी व रुबीना चाँद शेख या यशस्वी महिला उद्योजकांचा सन्मान केला.

प्रमुख अतिथी म्हणून उपायुक्त डी. एल. ठाकरे महिला उद्योजकतेचे महत्त्व अधोरेखित करताना म्हणाले, महिलांनी आता प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली असून समाजात आता खऱ्या अर्थाने नव्या परिवर्तनाची सुरुवात केली आहे. डॉ. स्वाती शेरकर यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका मांडली. विद्यापीठ रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव यांनी आभार मानले. व्यवस्थापक अमोल हिरुळकर, नरेश मोवळे, रविकुमार ढेंगळे व ऋषिकेश खवणे यांनी परिश्रम घेतले.सन्मानित महिला उद्योजक आणि त्यांचे स्टार्टअप्स शिवानी बापट यांनी आपल्या स्टार्टअपच्या माध्यमातून महिलांचे आरोग्य आणि वेलनेस क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. डॉ. केतकी कालेले बायोटेक्नॉलॉजी आणि वैद्यकीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी हेल्थकेअर इनोव्हेशनमध्ये महत्त्वाचे संशोधन केले आहे. नेहा मोटवानी यांचा स्टार्टअप कृषी क्षेत्रात तांत्रिक नवकल्पना आणत असून शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने स्वयंपूर्ण बनवत आहे. रुबीना चाँद शेख महिलांसाठी आरोग्यवर्धक आणि जैविक उत्पादने तयार करतात.

# राणा दाम्पत्यांचे होळीनिमित्य मेळघाटातील सर्व नियोजीत कार्यक्रम रद्द



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

गेल्या १५ वर्षापासून मा.खा.नवनित रवि राणा व आ.रवि राणा हे आपली होळी घरी साजरी न करता आदिवासी बंधु भगिनींसोबत साजरी करून त्यांच्या आनंदात व उत्साहात सहभागी होत होते. परंतु यावर्षीची होळी आदिवासी बंधु भगिनीसोबत दरवर्षीप्रमाणे साजरी करु शकणार नाही. कारण मा.खा.नवनित रवि राणा यांच्या मातोश्री तसेच आ.रवि राणा यांच्या सासु माँ रजिंदर हरभजनसिंग कौर यांच्या दुःखद निधनामुळे मेळघाटातील होळीनिमित्य आयोजित सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहे. तसेच मा.खा.नवनित रवि राणा व आ.रवि राणा यांनी मेळघाटातील सर्व आदिवासी बंधु भगिनींना व नागरिकांना होळीच्या शुभेच्छा देऊन परमेश्वर सर्व आदिवासी बंधु भगिनींच्या जिवनामध्ये होळीच्या रंगासारखा आनंद द्विगुणीत करावा अशी प्रार्थना केली आहे .

# लाल फुलांनी बहरले आयुर्वेदीक काटेसावर

## पानगळीनंतर रणरणत्या उन्हात फुललेला वृक्ष वेधून घेत आहे निसर्गप्रेमींचे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

मार्च महिन्याच्या सुरुवातीला उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात जाणवू लागली आहे. या दरम्यान सिंदखेडराजा – मेहकर महामार्गालगत लालबुंद फुलांनी बहरलेले काटेसावर वृक्ष निसर्गप्रेमींचे लक्ष वेधून घेत आहेत. काटेसावरीच्या फुलांकडे बुलबुल, हळदे, चिमणी, कोतवाल असे विविध पक्षी कळ्या व फुलांचा आस्वास घेण्यासाठी, तसेच फुलातील मधुरस शोषण्यासाठी आकर्षित होत आहेत.

सावर, शेवरी, काटेसावर या नावांनी ओळखले जाणारे काटेसावर वृक्ष आपले अस्तित्व टिकवून विविध पक्षी तसेच निसर्गप्रेमींसह सर्वांच्याच आकर्षणाचे केंद्र झाले आहे. या वृक्षाला संपूर्ण काटे असल्याने त्याला काटेसावर असे म्हणतात. काटेसावरीचे वनस्पतीशास्त्रीय नाव बॉम्बॅक्स सिबा असे असून मोचा, रक्तपुष्प तसेच स्थिरायू आदी पर्यायी नावानेहा हा वृक्ष ओळखला जातो. काटेसावरीला हिंदीमध्ये सेमल,संस्कृतमध्ये शाल्मली, तर इंग्रजीत सिल्क कॉटन ट्री असे म्हटले जाते. ग्रामीण भागात याचा काटशिवरी असाही उल्लेख केला जातो. काटेसावर बहरण्यापूर्वी संपूर्ण वृक्षाची पानगळ होऊन जाते. त्यानंतर पर्णहीन वृक्षाला मोठ्या आकाराची लाल रंगाची हजारो फुले येऊन तो पूर्णपणे बहरून जातो. अशावेळी बहरलेल्या वृक्षाचे रूप अत्यंत सुंदर आणि देखणे भासते. असे बहरलेले बऱ्यापैकी उंच असणारे हे वृक्ष परिसरातून जाणाऱ्यांचे लक्ष वेधून घेतात. अनेक भागात काटेसावर वृक्ष दृष्टीस पडत नसले तरी काही भागात उन्हाळ्याच्या दिवसांत त्यांचे अस्तित्व जाणवते. अशाचप्रकारे सद्य:स्थितीत सिंदखेडराजा – मेहकर महामार्गालगत काटेसावरीच्या वृक्षांची पानगळ झाली असून, ते लालबुंद फुलांनी बहरलेले दिसून येत आहेत. त्यामुळे रणरणत्या उन्हात रस्त्यावरून जाणाऱ्या – येणाऱ्यांचे ते लक्ष वेधून घेत आहेत. काटेसावरीच्या फुलांकडे बुलबुल, हळदे, चिमणी, कोतवाल अशा विविध प्रकारचे पक्षी फुलातील मधुरस शोषण्यासाठी, तसेच कळ्या व फुले खाण्यासाठी आकर्षित होतात. वटवाघळे, खार यांचे हे आवडते झाड आहे. या झाडाची फुले लालभडक, लुसलुशीत व पाच पाकळ्या असलेली असतात.



# मेळघाटातील अतिदुर्गम भागात शासकीय महाविद्यालय मिळावे

## माजी जिल्हा परिषद सदस्य प्राचार्य सुकदेवराव पवार यांची मागणी



अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून आपल्या या कारकिर्दीत स्वप्नपूर्ती व्हावी असे आवाहन सुखदेव पवार जिल्हाध्यक्ष भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा जिल्हा अमरावती ग्रामीण ह्यांनी पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे....मेळघाटातील अतिदुर्गम भागातील रहिवाशांना अजूनही वैद्यकीय सेवा मिळत नाही त्यासाठी सर्व पक्षातील आमदार खासदारांनी एकत्र येऊन निकराचे प्रयत्न करावे व दुर्गम भागात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय काढावे.

**प्राचार्य सुखदेवराव पवार**
**माजी जिल्हा परिषद सदस्य.**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अचलपूर**

वेळ घाटातील कुपोषणाचा विषय अत्यंत संवेदनशील झालेला असून या कामी सर्व आमदार व खासदार यांनी एकत्रितपणे प्रयत्न करावे यासाठी माजीजिल्हा परिषद सदस्य सुखदेवराव पवार हे प्रयत्नशील असून त्यांनी याबाबत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनाही निवेदन पाठवलेले आहे निवेदनात त्यांनी म्हटले आहे की लहान मुलांच्या कुपोषण या विषयाने जगात प्रसिद्ध असलेल्या अतिदुर्गम मेळघाट विषयी सर्वांना आस्था असून सर्व विभागाकडून युद्ध स्तरावर उपाययोजना होत असून सुद्धा आरोग्याच्या बाबतीत मेळघाट जसेच्या तसे आहे या विषयावर अनेक वेळा चर्चा होऊन केंद्र आणि राज्य शासनाचे अनेक प्रतिनिधी मेळघाटात मुक्कामी राहून जवळून येथील लोकांचे जीवनमान आणि समस्या पाहून उथळ उपाययोजना करून थातूरमातूर मलम पट्टी होऊन वारंवार जनतेच्या तोंडाला पाने पुसल्या गेली आहेत. ही येथील वास्तविकता आहे. कुपोषण ,दूषित पाण्यामुळे होणारे डायरिया सारखे जीव घेणारे आजार खड्ड्यांच्या रस्त्यामुळे खाजगी बस पुलावरून खाली पडण्यासारखे अपघात अपघात आणि वारंवार वन्य पशूंचे हल्ले होत असताना गोलाई राणीगाव हतरू भांडुम वैराट अशी अनेक दुर्गम भागातील गावे ज्यांच्यापासून विकास अजूनही कोसो दूर आहे या सर्व अति दुर्गम गावांचे अंतर अमरावती महानगरापासून २०० किलोमीटर आहे इतक्या दूर अंतरावरचा दुर्धर आजाराचा रुग्ण अमरावती शहरातील दवाखान्यात पोहोचेपर्यंत मधातच त्याची अंत्ययात्रा काढावी लागते याच भागातील तीन वर्षाची महिमा नावाची लहान मुलगी आमच्या नजरेसमोर तडफडून मेल्याचं जिवंत उदाहरण आहे. तेव्हापासून या घटनेने संवेदनशील होऊन आज सतत पाच वर्षापासून जनतेच्या आरोग्याचा संघर्ष म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयचा प्रस्ताव तत्कालीन माननीय आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्याकडे माजी पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्यामार्फत पाठविलेला आहे. आरोग्याच्या बाबतीत निष्क्रिय असलेल्या प्रशासनाला त्रासून जाऊन संपूर्ण मेळघाटच्या जनतेने भारतीय जनता पार्टीला विक्रमी मताधिक्याने आमदार केवलरामजी काळे यांना निवडून दिले आहे. आज अमरावती जिल्ह्याची स्थिती महायुतीचे सात आमदार सोबत राज्यसभा खासदार अनिल बोंडे आरोग्याच्या बाबतीत अनेक यशस्वी उपक्रम राबविताना आज देशातही लक्षणीय ठरणारा २०२५या वर्षाचे ३६५ दिवस खासदार रक्तदान शिबिराचे आयोजन तसेच या उपक्रमाला जिल्हाभर कोरोनाच्या काळातील रक्ताची टंचाई पाहून युवा वर्गाकडून चांगला प्रतिसाद मिळतआहे. राज्यातही तडकाफडकी निर्णय घेणारे आपले सरकार म्हणून मुख्यमंत्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या कुशल नेतृत्वात हा विषय पूर्णत्वास जाईल असा येथील जनतेला आत्मविश्वास आहे या विषयाला मान्यता देण्याकरिता केंद्रातही आरोग्याच्या बाबतीत भरीव काम करणारे आमचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी आहेत मेळघाट विधानसभा मतदार संघापासून पासून ते केंद्रापर्यंत शेवटच्या घटकापर्यंत विकासाची गंगा जाईल अशी उपाययोजना करणारे भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे म्हणून साधी भोळी प्रामाणिक मेळघाटची जनता वरील अत्यावश्यक आणि महत्त्वपूर्ण अशा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मूर्त रूप यावे ही अपेक्षा.

# उद्याला इस्कॉनतर्फे श्री श्री गौर पौर्णिमा महामहोत्सव

## गौर निताई यांची शोभायात्रा आणि नगरसंकीर्तन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

राठीनगरस्थित सरस्वती कॉलनी येथील श्री श्री रुक्मिणी आध्यात्मिक संस्कार केंद्र (इस्कॉन) अमरावतीतर्फे गौर पौर्णिमा महामहोत्सवाचे आयोजन १४ मार्च रोजी करण्यात आले आहे.लोकनाथ स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाची सुरुवात शुक्रवार, १४ मार्च रोजी पहाटे ४:३०याजता श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश यांच्या शुभमंगल आरतीने होईल. त्यानंतर ७:३० वाजता दर्शन आरती होईल आणि त्यानंतर इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांची गुरुपूजा होईल. सायंकाळी पाच वाजता श्री श्री गौर निताई यांची शोभायात्रा निघेल, त्याचबरोबरनगर संकिर्तनसुद्धा करण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता भजन संध्या व हरिनाम संकीर्तन करण्यात येईल त्यासोबतच गौर निताई यांचा महाअभिषेक होईल. सायंकाळी सात वाजता अंतशेष प्रभुजी हे गौरलीला कथा सादर करतील. त्यानंतर रात्री ८:३० वाजता छप्पनभोग दर्शन, गौर निताई व श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश यांची महाआरती तसेच महाप्रसादाने संपूर्ण महामहोत्सवाची सांगता होईल.या कार्यक्रमांचा लाभअमरावतीकरांनी घ्यावा, असे आवाहन इस्कॉन अमरावतीचे अध्यक्ष अद्वैत आचार्य प्रभुजी यांनी केले आहे.



# इंटरशिप योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १३ अमरावती**


सुशिक्षित बेरोजगार युवक–युवतींसाठी केंद्र शासनाच्या वतीने प्रधानमंत्री इंटरशिप योजना सुरू केली आहे. यात तरूणांना मोठ्या कंपन्यांमध्ये इंटरशिपची संधी दिली जाणार आहे. सदर योजनेच्या दुसऱ्या फेरीसाठी पुन्हा अर्जप्रक्रिया सुरू करण्यात आली असून यासाठी दि. ३१ मार्चपर्यंत अर्ज करता येणार आहे. जिल्ह्यातील पात्र उमेदवारांना pminternship.mca.gov.in संकेतस्थळावर नोंदणी करावी लागणार आहे. उमेदवारांना १२ महिन्यांसाठी इंटरशिप मिळणार आहे, तसेच दरमहा ५ हजार रूपये मिळणार आहेत. याशिवाय इंटरशिप पूर्ण झाल्यानंतर ६ हजार रूपये एकरकमी अनुदान दिले जाणार आहे. या योजनेंतर्गत भारत सरकारकडून प्रत्येक प्रशिक्षणार्थीला प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेंतर्गत विमा संरक्षण दिले जाणार आहे.योजनेमध्ये तरूणांनी सहभागी व्हावे, अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, उस्मानिया मस्जिद परिसर, डेपो रोड, अमरावती येथे भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

# अचलपूर नगर परिषद क्षेत्रात स्पीड ब्रेकर आणि पाणीपुरवठा वेळ बदलण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अचलपूर**

अचलपूर नगर परिषद क्षेत्रातील जयस्तंभ चौक ते दुर्रानी चौकदरम्यान स्पीड ब्रेकर बसवण्याची आणि पाणीपुरवठ्याची वेळ सकाळी ५ वाजता करण्याची मागणी एमआयएम परतवाडा शाखेच्या वतीने मुख्य अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

एमआयएम परतवाडा शहराध्यक्षांच्या नेतृत्वाखाली नदीम खान, मोहम्मद आकिब, असलम खान, मुन्ना भाई केजीएन, बाबू खान, जहीर मामू, सोनू खान, रिजवान भाई, करीम भाई, नसीम खान, तौसीफ खान आणि इतर कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि नागरिकांच्या समस्या मांडल्या.



**जयस्तंभ चौक ते दुर्रानी चौक दरम्यान स्पीड ब्रेकरची गरज**

एमआयएम पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहने भरधाव वेगाने धावत असतात, त्यामुळे वारंवार अपघात होतात. विशेषतः वयोवृद्ध, महिला आणि लहान मुलांना रस्ता ओलांडताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. यावर उपाय म्हणून या रस्त्यावर आवश्यक त्या ठिकाणी स्पीड ब्रेकर बसवावेत, जेणेकरून अपघातांची संख्या कमी होईल आणि नागरिकांना दिलासा मिळेल.

**पाणीपुरवठा सकाळी ५ वाजता सोडण्याची मागणी**

नागरिकांनी सकाळी ७ ऐवजी ५ वाजता पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी केली. सकाळी लवकर पाणी मिळाल्यास नागरिकांना आपल्या दैनंदिन कामांमध्ये सोय होईल. तसेच रमजानच्या पवित्र महिन्याचा विचार करता ही मागणी करण्यात आली आहे, जेणेकरून रोजेदारांना त्याचा फायदा होईल.

**मुख्य अधिकाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद**

मुख्य अधिकाऱ्यांनी या मागण्यांवर योग्य तो विचार करून लवकरच निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले. स्पीड ब्रेकर उभारण्यासाठी यातायात विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मंजुरी घेऊन आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

**नागरिकांच्या आशा पल्लवित**

एमआयएमच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये आशा निर्माण झाली आहे. नगर परिषद यावर कधी आणि कशी अंमलबजावणी करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शेतकरी म्हणतोय.. पाणंद रस्त्यांचा झालाय ओढा आता महामार्गाचा नाद सोडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

राज्यातील शेताकडे जाण्यासाठी असणाऱ्या पाणंदींची अवस्था बघितली तर शेतकरी म्हणूनच शेती करतो, असे वाटल्याशिवाय राहणार नाही. गेल्या ३० वर्षांत कुठल्याही पाणंदीवर एक खडासुद्धा पडलेला नाही.१९९७ पूर्वी साखर कारखाने ऊस वाहतुकीसाठी थोडा फार मुरूम टाकत होती. आता त्यांनीही ते बंद केल्याने शेताकडे जाऊन यायचे म्हणजे युद्धावर जाण्यासारखी मानसिकता करूनच बाहेर पडावे लागते.

शासनाला खरंच विकास करायचा असेल तर शक्तिपीठाचे ८६ हजार कोटी गावागावांतील पाणंदी दुरुस्तीसाठी खर्च करावेत, पुढील ५० वर्षे महाराष्ट्र खात्रीने तुमचं नाव काढल्याशिवाय राहणार नाही.

१९९७ पर्यंत ऊस झोनबंदी होती, म्हणजे एका कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस दुसऱ्या कारखान्याला आणता येत नव्हता शेतकऱ्यांच्या उसातून प्रतिवर्षी




भाग विकास निधीच्या नावाखाली ठराविक रक्कम कापून कारखाना त्यातून पाणंदींची डागडुजी करत होता.त्यातूनच वाट काढत शेतकरी जनावरांना चारा, शेताला पाणी, मशागत या कामासाठी ये-जा करतो. ऊस तोडणी करताना तर शेतकऱ्याला सगळे देव आठवतात.

कारण कुठल्या चरीत जाऊन ट्रॅक्टर उलटेल याचा नेम नसतो. त्यात काही बहाद्दर शेतकरी नेमाने रस्त्यावर पाणी सोडण्याचे पुण्य करत असल्याने रस्ता आहे का ओढा, हेच कळत नसल्याचे चित्र आहे.

सरकारला शेतकऱ्यांच्या जीवनात सुखाचे दिवस आणायचे असतील तर पाणंदी दुरुस्ती कार्यक्रम हाती घ्यावा. ८६ हजार कोटी रुपयांत राज्यातील सगळ्या पाणंदी उजळून निघतील.त्यामुळे शेतकऱ्याचे जगणे सुसह्य होईल. शेतकरी जे मागत नाही ते करतो म्हणायचे आणि ज्याची निकड आहे ते करायचे नाही हा कुठला व्यवहार म्हणायचा.

**नदीकाठच्या पाणी योजनेचे काय करणार**

कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांत खासगी व सहकारी पाणीपुरवठा संस्थांचे जाले आहे. शेतकऱ्यांनी हिमतीने ५ ते १० किलोमीटरवर पाणी आणून शेती फुलविली, शक्तिपीठ ५ नद्यांवरून जाणार असेल तर तेथील पाणी योजनेच्या पाइप काढाव्या लागतील किंवा त्या महामार्गाखाली गडप होतील. रस्ता झाल्यावर या योजनांचे काय करणार याची स्पष्टता नाही. महामार्ग बांधणार म्हणून शेतकऱ्याने हिमालयात जावे का, हे तरी एकदा सांगावे.

**१०७ कोटी एका किलोमीटरसाठी खर्च**

महामार्ग करत असताना किलोमीटरसाठी ३५ कोटी रुपये खर्च करावा, असा नियम आहे. परंतु शक्तिपीठसाठी किलोमीटरला १०७कोटी रुपये खर्च प्रस्तावित आहे. आर्थिक पाहणी अहवालात राज्यावर ७ लाख ८२ हजार कोटी रूपये कर्ज असल्याचे व व्याजासाठीच वर्षाला ५६ हजार कोटी मोजावे लागत असल्याचे पुढे आले. असे असताना ऋण काढून महामार्गाचा सण करायला कोणी सांगितले, हे लोकप्रतिनिधींना विचारण्याची वेळ आली आहे.

# शहरात आज ४८० सार्वजनिक होळीचे होणार दहन तर उद्याला सर्व उड्डाणपूल राहणार बंद


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

अमरावती शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत ४८० सार्वजनिक होळीचे दहन करण्यात येणार आहे, तर १७६६ ठिकाणी खाजगी होळी दहनाचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती शहर पोलीस आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे. १३ व १४ मार्च रोजी होळी व धुलिवंदन सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व १० पोलीस ठाण्यांतर्गत प्रत्येक कोपऱ्यात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले. त्याअंतर्गत शहरातील सर्वओव्हरपास सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्याबरोबरच मद्यप्राशन करून रस्त्यावर गोंधळ घालणाऱ्या किंवा कोणत्याही प्रकारे गोंधळ घालणाऱ्यांवर कडक नजर ठेवून अश्याया लोकांवर कारवाई करण्यात येणार आहे.

**होळीनिमित्त असा राहील बंदोबस्त**

अमरावती शहरात ३ डीसीपी, ५ एसीपी, २०



पीआय, ४५ एपीआय आणि पीएसआय आणि ३०० होमगार्ड आणि एसआरपीएफची एक कपनी असे ३५० पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात येणार आहेत. याशिवाय प्रत्येक पोलीस ठाणेही त्यांच्या अखत्यारीत त्यांच्या स्तरावर बंदोबस्त करणार आहे. धुलिवंदनाच्या सणावर दारू पिऊन धुमाकूळ घालतात, दारू पिणाऱ्यांवर विशेष नजर ठेवावी. अशा स्थितीत दारू पिऊन झाल्यावर पोलिस कारवाईही केली जाईल.

**उद्याला सर्व उड्डाणपूल बंद**

चोरट्यांवर करडी नजर ठेवली जाईल. गोंधळ घालणाऱ्या लोकांसोबतच दारू विक्रेत्यांवरही बारीक लक्ष ठेवण्यात येणार असून कुठेही नियमांचे उल्लंघन होत असल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता लक्षात घेता उड्डाण पुल १४ रोजी सकाळपासून दुपारपर्यंत बंद राहणार आहे. अमरावती शहरातील तीनही उड्डाणपूल १४ मार्च रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ या वेळेत सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय शहर वाहतूक पोलिसांनी घेतला आहे. त्याबाबत अधिसूचनाही जारी करण्यात आली आहे.

# रोजगार मेळाव्यात ६८ उमेदवारांची प्राथमिक निवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १३ अमरावती**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर तसेच विद्याभारती महाविद्यालय यांच्यावतीने दि. १२ मार्च रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात ६८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.मेळाव्यात २१० उमेदवारांनी ऑनलाइन, ऑफलाईन सहभाग नोंदविला. यातील १६२ उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन मुलाखती दिल्या. यापैकी ६८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. यावेळी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, नितीन मेटागे, वैशाली पवार, अभिषेक ठाकरे, जितेंद्र गायकवाड उपस्थित होते. तसेच महिंद्रा आणि महिंद्रा, रेनबो कोटिंग प्रायव्हेट लिमिटेड बडनेरा, पीपीएस एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड अमरावती, क्रेडीट एक्सेस ग्रामीण प्रायव्हेट लिमीटेड अमरावती, जाधव गियर प्रायव्हेट लिमिटेड अमरावतीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# राज्य सरकारचा युवा पुरस्कार प्राप्त शेतकऱ्याची आत्महत्या; सणादिवशीच मृत्यूला कवटाळले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३बुलढाणा**

राज्य शासनाचा युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त तरुणाने सुसाईड नोट लिहीत मृत्यूला कवटाळल्याची घटना बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा या तालुक्यात घडली आहे. कैलास नागरे असं या युवा शेतकऱ्याचं नाव असून माझ्या आत्महत्येस सरकार कारणीभूत असल्याचं नागरे यांनी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये म्हटलं आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून पाण्यासाठी लढा देऊनही सकारात्मक प्रतिसाद न देण्यात आल्याने मी हे टोकाचं पाऊल उचलत असल्याचा उल्लेख या नोटमध्ये आढळून आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देऊळगाव राजा येथील शिवनी आरमाळ शिवारात कायमच पाण्याची चणचण जाणवते. ही समस्या दूर व्हावी यासाठी कैलास नागरे यांनी परिसरातील शेतकऱ्यांना सोबत घेऊन आंदोलन उभारले होते. यंदा ओव्हरफ्लो झालेल्या खडकपूर्णा धरणातून शिवनी आरमाळ येथील पाटबंधारे विभागाच्या लघु प्रकल्पात पाणी सोडावे, अशी नागरे यांची मागणी होती. विशेष म्हणजे आंदोलनानंतर शासकीय अधिकाऱ्यांनी कैलास नागरे यांना




पाणी सोडण्याबाबत लेखी आश्वासनही दिले होते. परंतु मार्च महिना उजाडला तरी ही मागणी मान्य न करण्यात आल्याने अखेर या युवा शेतकऱ्याने टोकाचं पाऊल उचलत विषारी औषध पिऊन आपलं जीवन संपवलं.

कैलास नागरे यांनी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये म्हटलंय की, आमच्याकडे सिंचनाच्या सर्व सुविधा आहेत. परंतु तरीही पाणी येत नाही. माझ्यावर आता केळी आणि पपईच्या शेतात अंत्यसंस्कार करा व राख आनंदस्वामी धरणात टाका. मुख्यमंत्र्यांनी माझ्या मुलांचे पालकत्व स्वीकारावं. माझ्या मुलांचे शिक्षण करण्यासाठी मी असमर्थ ठरलो... स्वतः शून्य झालो.

दरम्यान, आधुनिक पद्धतीने शेती करण्याची आवड असलेला आणि राज्य सरकारने पुरस्कार देऊन गौरन्वित केलेल्या शेतकऱ्यानेच आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल उचलल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# उन्हाची तीव्रता वाढली; आता शाळांच्या वेळांमध्येही बदल

## जिल्ह्यातील सर्व शाळा २० मार्चपासून सकाळच्या सत्रात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती**

मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाची तीव्रता जाणवू लागली आहे. दुपारच्या वेळेस उष्णता वाढत आहे. या दिवसात ग्रामीण भागात पाण्याची टंचाईची समस्याही जाणवत असते. त्यामुळे जिल्ह्यात दुपारच्या वेळी भरणाऱ्या शाळा सकाळी भरवण्याची मागणी शिक्षक संघटनांनी जिल्हा परिषदेकडे केली होती.

आता जिल्ह्यातील सर्व शाळा २० मार्चपासून सकाळच्या सत्रात भरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सकाळी साडे ७ ते दुपारी साडे १२ अशी शाळांची वेळ असेल. हा




निर्णय खासगी व्यवस्थापन, जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका, नगरपंचायतींच्या शाळांना लागू असेल. सध्या शहराचे तापमान ३८ ते ३९ अंश सेल्सिअस आहे. येत्या काळात ते चाळीशी पार करेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे. त्यामुळे हा निर्णय घेतला. या निर्णयाने २ लाख ५६ हजार विद्यार्थी, त्यांचे पालक, साडे पाच हजारहून अधिक शिक्षक, ०६४ शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

बहुतेक शाळांत वर्षभर दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ५ अशी सहा तासांची शाळा भरवली जाते. त्यामुळे मधल्या दोन सुट्यांचा कालावधी घरून सहा तासांचा अवधी होतो. तो कायम ठेवण्यासाठी सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० ही वेळ निवडली आहे. ही वेळ निवडताना मधल्या सुट्यांची वेळही कमी केली. त्यामुळे आधी जेवढ्या कालावधीचे अध्ययन व्हायचे, तेवढ्याच वेळेचे अध्ययन आताही होणार आहे. असा निर्णय घेण्यासाठी शिक्षक संघटनांसह पालकांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे मागणी केली होती.उन्हाची दाहकता वाढत असल्यामुळे काही जिल्ह्यांत १७ मार्चपासूनच सकाळच्या शाळा भरवणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर येथे बदल केला जावा, असे विद्यार्थी-पालकांसह शिक्षकांचे म्हणणे होते. या मागणीला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने होकार दिला असून २० मार्चपासून सर्व शाळा दुपारच्या सत्रात न भरवता सकाळच्या सत्रात भरवणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

प्राथमिक शिक्षण अधिनियमानुसार शिक्षण निरीक्षकांच्या मान्यतेनुसार उन्हाळ्यात दररोज किमान दोन तास व अन्य ऋतूत शाळांचे तीन तास कमी करता येतील. तसेच माध्यमिक शाळा संहितेनुसार उन्हाळ्यात शाळेचे कामाचे तास सकाळी सहा तासांपेक्षा कमी ठेवता येतील मात्र, अध्यापनाचे तास चार तासांपेक्षी कमी नकोत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे वरील संदर्भ लक्षात घेऊन शिक्षण विभागाने शाळांच्या वेळेत बदल करण्याची मागणी शिक्षक संघटनांनी केली होती.

# अमरावतीकरांनो धुळवडीला पाणी वापरा जपून! गेल्या १५ दिवसांत आठ टक्क्यांनी घटून ५६ टक्क्यांवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अमरावती जिल्ह्याला पाण्याच्या पुरवठा करणाऱ्या अप्पर वर्धा धरणांतील एकूण पाणीसाठा गेल्या १५ दिवसांत आठ टक्क्यांनी घटून ५६ टक्क्यांवर आला आहे. वाढत्या तापमानामुळे धरणांतील बाष्पीभवन वाढल्याने पाणीसाठा कमी होऊ लागला आहे. त्यामुळे अमरावतीकरांना आता होळी-धुळवडीपासूनच पाणी जपून वापरावे लागणार आहे.

धरण क्षेत्रांत यंदा चांगला पाऊस झाला होता. अप्पर वर्धा धरण १०० टक्के



भरली होती. मात्र सध्याच्या घडीला या धरणात केवळ ५६ टक्केच पाणी साठा शिल्लक राहिलेला आहे या धरणातून शहराला आणि शेती सिंचनासाठी पाणी पुरवठा केल्या जातो. सध्या हा पाणीसाठा पुरेसा असला तरी शहरात अनेक ठिकाणी आतापासूनच कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे अनेक भागांत पाणीटंचाई भेडसावत आहे.

जूनमध्ये पावसाला सुरुवात होत असली तरी प्रत्यक्षात धरण क्षेत्रात जुलैत मोठा पाऊस पडतो. पाण्याची मागणी उन्हाळ्यात वाढते, त्यामुळे हा पाणीसाठा जुलैपर्यंत पुरवून वापरावा लागणार आहे.

धूलिवंदनच्या दिवशी शक्यतो पाण्याचा वापर टाळावा. कोरड्या रंगांवर भर द्यावा, असे आवाहन अमरावती महानगर पालिकेने केले आहे.

# शकुंतला रेल्वेच्या ब्रॉडगेजसाठी चक्काजाम आंदोलनाचा इशारा

## विभागीय आयुक्तांना शकुंतला बचाव समितीचे निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अचलपूर शकुंतला रेल्वेचा विषय निकाली लावून ब्रॉडगेज करण्यात यावी, याकरिता शकुंतला बचाव सत्याग्रह समितीने श्वेता सिंघल (विभागीय आयुक्त) यांच्यासह जिल्हाधिकाऱ्यांना १२ मार्च रोजी निवेदन सादर केले. तसेच समितीने आगामी २३ मार्च रोजी शहीद दिनाच्या दिवशी अचलपूर येथे चक्का जाम आंदोलन करण्याचा



इशाराही दिला आहे.समितीची आढावा बैठक नुकताच पार पडली. या बैठकीत विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत आंदोलनाच्या पुढील रणनीतीवर सविस्तर चर्चा झाली. समितीने प्रशासनाला १२ मार्च रोजी लेखी पूर्वसूचना देण्याचानिर्णय घेतला होता. अचलपूर ते मूर्तिजापूरदरम्यान धावणारी शकुंतला नैरोगेज रेल्वे अचानक बंद झाली आणि तब्बल सात वर्षांपासून ती पुन्हा सुरू करण्यासाठी संघर्ष सुरू आहे. ही रेल्वे ब्रॉडगेजमध्ये रूपांतरित झाली, तर हा संपूर्ण परिसर आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या अधिक विकसित होईल. या मागणीसाठी ३० पेक्षा अधिक आंदोलने करण्यात आली आहेत; मात्र अजूनही शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे पुन्हा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. शकुंतला रेल बचावचे योगेश खानझोडे, राजा धर्माधिकारी, एस.बी. बारखडे, वसंत धोबे, दयाराम चंदे, कवी राजा धर्माधिकारी, राजेश अग्रवाल, दिपा तायडे, दयाराम चंदेल, राजेंद्र पांडे, किरण गवई, एस. बी बारखडे, विजय गोंडचवर, राजेंद्र जयस्वाल, वसंत धोबे, संजय डोंगरे आदी यावेळी उपस्थित होते.

# अंध विद्यार्थ्यांसाठी 'इको फ्रेंडली धुलीवंदन'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

येथील डॉ. नरेंद्र भिवापुरकर अंध विद्यालयात 'इको फ्रेंडली धुलीवंदन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विविध सामाजिक संघटनातर्फे आयोजित या कार्यक्रमात अंध विद्यार्थ्यांसाठी विशेषतः कोरड्या रंगांची होळी आयोजित करण्यात आली, ज्यामुळे त्यांना रंगांचा आनंद घेता आला.दिव्यांग बांधवांसोबत स्नेह वाढवण्याच्या उद्देशाने दरवर्षी हा उपक्रम राबविण्यात येतो. यावेळी अंध विद्यार्थ्यांनी डीजेच्या तालावर थिरकत एकमेकांना रंग लावून होळीचा सण साजरा केला.



वानमाला बहुद्देशीय संस्था, साद फाउंडेशन आणि दिशा बहुद्देशीय संस्था स्वराज्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने अनोख्या होळी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा कार्यक्रम फक्त एक सण नसून, समता, समरसता आणि आनंद यांचे प्रतीक आहे. विविध सामाजिक संस्था आणि नागरिक यामध्ये सहभागी झाले होते